# वोटचोरी, सीटचोरी नंतर आता नागरिकता चोरीचे देशासमोर संकट : मिनाक्षी नटराजन

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** देशात सध्या लोकशाहीसमोर मोठे संकट उभे आहे. कालपर्यंत वोटचोरी केली जात होती, त्यानंतर सीटचोरी केली जाऊ लागली, मग पक्ष चोरी केले जाऊ लागले, आस्थेची चोरी केली जात आहे आणि आता तर सर्वात मोठा धोका उभा ठाकला आहे. हे सरकार आता नागरिकताही चोरी करू लागले आहे, हा गंभीर धोका ओळखा. नागरिकता नाकारून तुमचे मानवी हक्क व अधिकार नाकारले जात आहेत, म्हणून वेळीच सावध व्हा आणि लोकशाही वाचवण्यासाठी आवाज बुलंद करा, असे आवाहन अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या तेलंगणाच्या प्रभारी मिनाक्षी नटराज यांनी केले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने टिळक भवन येथे 'लोकशाही वाचवा निर्धार सभा' आयोजित करण्यात आली होती. या सभेस अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या तेलंगणा प्रभारी मीनाक्षी नटराजन, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर सभेच्या अध्यक्षस्थानी काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ होते. यावेळी विधान परिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव तेलंगाणाचे सहप्रभारी सचिन सावंत, राष्ट्रीय प्रवक्ते, माजी आमदार चरणजित सप्रा, ज्येष्ठ समाजसेविका उल्का महाजन, तिस्ता सेटलवाड, चित्रा राणे, जयंत दिवाण आदी उपस्थित होते..



मिनाक्षी नटराजन म्हणाल्या, माझा राज्यसभेचा उमेदवारी अर्ज बेकायदेशीरपणे रद्द केला हा महत्वाचा प्रश्न नाही तर माझा उमेदवारी अर्ज रद्द करण्यासाठी एक मोठे षडयंत्र रचले होते. भाजपाकडे पुरेसे संख्याबळ नसतानाही त्यांनी तिसरा उमेदवार उभा केला होता. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना धमकावण्यात आले. आमच्या तक्रारीची दखलही न घेता निर्णय देण्यात आला. माझ्या उमेदवारीवर आक्षेप घेऊन मला पुरेसा वेळ व संधी दिली नाही पण झारखंडमधील एका उमेदवाराला मात्र त्याच्या अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी २४ तासांचा वेळ दिला, आमचे ऐकूणही घेतले नाही. यानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला व लोकांनी आवाज उठवला. माझ्यासाठी राज्यसभा नाही तर जनसभा अधिक महत्वाची आहे, असेही नटराजन म्हणाल्या.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, मिनाक्षी नटराजन यांचा राज्यसभेचा अर्ज बेकायदेशीरपणे रद्द करून नटराजन यांच्यावर अन्याय केला असे नाही तर लोकशाहीवरच अन्याय केला आहे. देशात आज करो या मरोची परिस्थिती असून आता स्वातंत्र्याची दुसरी लढाई लढण्याची गरज आहे. देशात मनुवादी विरुद्ध संविधानवादी हे दोनच विचार आहेत आणि लोकशाही व संविधान वाचवणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.. विधान परिषदेतील काँग्रेसच गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यावेळी म्हणाले की, मागील १२ वर्षापासून देशातील परिस्थिती बदलेली आहे, लोकशाही व्यवस्था धोक्यात आलेली आहे. सरकार विरोधकांचा आवाज दडपून टाकत आहे, हे लोकशाहीसाठी घातक आहे म्हणून लोकशाही वाचवणे हे सर्वात महत्वाचे आहे, या लढाईत १५ ते २५ या वयोगटातील तरुण वर्गाला सहभागी करून घेतले पाहिजे, या तरुणाईची लोकसंख्या तब्बल ५४ टक्के आहे म्हणून या लढाईत या वर्गाचा सहभाग असणे महत्वाचे आहे. तुषार गांधी म्हणाले, देशातील आजची परिस्थिती ब्रिटीश राजवटीपेक्षा वाईट आहे. सध्या वैचारिक गुलाम बनवले जात आहे, या सरकार विरोधात रस्त्यावरची मोठी लढाई लढावी लागणार आहे. सरकारविरोधात मोठा लढा निर्माण केला तरच सत्तेला हादरे बसतील पण मोठा विरोधी आवाजच होत नाही म्हणून सरकार त्याचा फायदा उठवत आहे. संविधानाला विरोध हा काही आता केला जात नाही तर संविधान निर्माण होत असल्यापासूनच त्याला विरोध केला जात होता. सत्ताधारी भाजपा संविधानाला सशक्त करणाऱ्या संस्थांवरच घाला घालत आहे, असा आरोप केला.

# कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची चेंबूर येथील टाटा पॉवर प्लांटला भेट

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** चेंबूर, माहूल रोड येथील टाटा पॉवर थर्मल पॉवर कंपनीच्या जनरेशन स्टेशनला राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज भेट देऊन पाहणी केली. या दौऱ्याचा मुख्य उद्देश प्लांटमधील बॉयलरच्या वापराची प्रत्यक्ष पाहणी करणे आणि औद्योगिक सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेणे होता. यावेळी उपसचिव दीपक पोकळे, बाष्पके संचालक धवल अंतलूरकर, तसेच श्री. चिवटे आदी उपस्थित होते. टाटा पॉवरचे ट्रॉम्बे प्रमुख आशिष भट यांनी कामगार मंत्र्यांचे स्वागत करून त्यांना प्लांटचे दैनंदिन कामकाज, सध्या भेडसावणारी तांत्रिक आव्हाने आणि त्यावर प्रशासनातर्फे करण्यात आलेल्या अत्याधुनिक उपाययोजनांची सविस्तर माहिती दिली.या भेटीदरम्यान कामगार मंत्र्यांनी प्लांटच्या कामकाजाशी संबंधित विविध क्लिष्ट तांत्रिक आणि व्यावसायिक बाबी सखोलपणे समजून घेतल्या.

त्यांनी युनिट क्षमता, उपकरणांची कार्यक्षमता आणि वीज निर्मिती प्रक्रियेत खारट पाणी वापरताना येणाऱ्या अडचणी व आव्हाने याविषयी माहिती घेतली. सध्याच्या डिजिटल युगात औद्योगिक क्षेत्राला भेडसावणाऱ्या सायबर धोक्यांची दखल घेत मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी टाटा पॉवरच्या कामकाजावर होणाऱ्या संभाव्य सायबर हल्ल्यांच्या परिणामांबाबत आणि त्यावरील खबरदारीबद्दलही चौकशी केली.

# पॉलीटेक्निक प्रवेश अर्जासाठी 6 जुलैपर्यंत मुदतवाढ ; हजारो विद्यार्थ्यांना दिलासा – उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी विद्यार्थीहिताला सर्वोच्च प्राधान्य देत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी (पॉलीटेक्निक) अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची मुदत दि. ६ जुलै २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांकडून होत असलेली मुदतवाढीची मागणी आणि प्रवेश प्रक्रियेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे राज्यभरातील हजारो विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्याची आणखी एक संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे असे मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले. मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. २ जुलै २०२६ होती. अंतिम मुदतीपर्यंत राज्यभरातून १ लाख ६१ हजार ७८६ उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी केली असून, त्यापैकी १ लाख ३२ हजार ९९६ विद्यार्थ्यांनी आवश्यक शुल्क भरून आपले अर्ज निश्चित केले आहेत.

प्रवेश प्रक्रियेदरम्यान ग्रामीण व दुर्गम भागातील अनेक विद्यार्थ्यांना कागदपत्रांची पूर्तता, ऑनलाइन अर्ज भरणे, शुल्क भरणे तसेच तांत्रिक अडचणींमुळे निर्धारित मुदतीत अर्ज पूर्ण करता आला नव्हता. अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, या उद्देशाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अर्ज भरण्यासाठी ही अखेरची संधी उपलब्ध करून दिली आहे. राज्य शासन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करत असताना राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण अधिक विद्यार्थी-केंद्रित, पारदर्शक आणि सुलभ करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. प्रवेश प्रक्रियेत कोणताही पात्र विद्यार्थी केवळ मुदतीअभावी वंचित राहू नये, हा शासनाचा स्पष्ट दृष्टिकोन असून त्याच अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे, असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी स्पष्ट केले. इच्छुक विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा लाभ घेत दि. ६ जुलै २०२६ पर्यंत आपला अर्ज निश्चित करावा, असे आवाहन मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले आहे. प्रवेश प्रक्रियेच्या कॅप फेऱ्यांचे सुधारित वेळापत्रक, प्रवेश नियमावली, आवश्यक कागदपत्रांची माहिती तसेच ऑनलाइन अर्ज भरण्याची सुविधा ू.ऺऺॢदन.ग्ह या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज निश्चित करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असेही आवाहन त्यांनी केले.

# सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करा: सत्यजीत तांबे

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि परवडणाऱ्या आरोग्य सुविधा मिळण्यासाठी शासकीय आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करणे, आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे, तसेच खासगी रुग्णालयांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याची गरज असल्याचे विधानपरिषद आमदार सत्यजीत तांबे यांनी अर्धा तास चर्चेदरम्यान मांडले.

आमदार तांबे यांनी सांगितले की, राज्यात शासकीय रुग्णालयांमधील मनुष्यबळाची कमतरता, औषधांचा तुटवडा आणि उपचारांतील विलंब यामुळे मोठ्या प्रमाणावर रुग्णांना खासगी रुग्णालयांकडे जावे लागत आहे. आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जनआरोग्य योजनेमुळे मोठा आधार मिळत असला तरी अनेक आजार आणि अनेक नामांकित रुग्णालये अद्याप या योजनांच्या कक्षेबाहेर आहेत. त्यामुळे मुंबई-पुण्यातील प्रमुख रुग्णालयांनी या योजनांमध्ये सहभागी व्हावे यासाठी शासनाने आवश्यक ती भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली. मुख्यमंत्री सहायता निधीची प्रक्रिया अधिक सुलभ करून लोकप्रतिनिधींनाही ऑनलाइन प्रस्ताव सादर करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, सर्व शासकीय रुग्णालयांचे स्वतंत्र संस्थेमार्फत नियमित गुणवत्ता मूल्यमापन (ऑडिट) करावे, ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांची डिजिटल आरोग्य नोंद प्रणाली विकसित करावी तसेच कम्युनिटी हेल्थ ऑफिसर पदासाठी होमिओपॅथी डॉक्टरांनाही संधी द्यावी, अशी मागणीही सत्यजीत तांबे यांनी केली. याशिवाय आयुष्मान भारत योजनेत समाविष्ट नसलेल्या आजारांबाबत शासनाने स्पष्ट धोरण जाहीर करण्याची तसेच कामगार रुग्णालयांनाही या आरोग्य व्यवस्थेशी जोडण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. यावर उत्तर देताना आरोग्यमंत्री आबिटकर यांनी आमदार सत्यजीत तांबे यांनी मांडलेल्या अनेक सूचनांचे स्वागत केले. राज्यातील शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी ग्रामीण रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेससारख्या संस्थेमार्फत आरोग्य व्यवस्थेचे ऑडिट करण्याच्या सूचनेचाही सकारात्मक विचार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. मंत्री आबिटकर म्हणाले की, ग्रामीण भागातील आरोग्य सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी डॉक्टरांना अधिक प्रोत्साहन देण्यात येत असून, शासकीय रुग्णालयांमध्ये या योजनांचा विस्तार करण्यात आला आहे. तसेच आयुष्मान भारत योजनेचा लाभ अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहोचावा, यासाठी जनजागृती आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले. आमदारांनी केलेल्या सूचनांचा विचार करून आरोग्य सेवा अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, अशी सकारात्मक ग्वाहीही त्यांनी दिली.

# एअर इंडियामध्ये नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या बनावट कॉल सेंटरचा पर्दाफास 11 आरोपी अटकेत

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** २७/०२/२०२६ रोजी मानखुर्द पोलीस ठाणे येथे फिर्यादीला एअर इंडिया मुंबई या ठिकाणी नोकरी देतो असे आमिष दाखवुन २,५८,००० रूपयाची फसवणुक केल्या बाबत अज्ञात इसमाविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला.



आरोपीचा शोध घेत असताना तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपी व त्याचे साथीदार डेहराडुन उत्तराखंड येथुन रॅकेट चालवत असल्या बाबत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. त्या ठिकाणी मानखुर्द पोलीस ठाण्याचे विशेष पथक डेहराडुन उत्तराखंड येथे जावुन ११ आरोपींकडून ९ लॅपटॉपसह १३ मोबाईल फोन तसेच फसवणुकीसाठी वापरण्यात येणारे बनावट कॉल सेंटरचा संपूर्ण सेटअप जप्त करण्यात आला. तपास सुरू आहे.

ही कारवाई अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग धनंजय कुलकर्णी, पोलीस उप आयुक्त, पुर्व परिमंडळ १, समिर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली मानखुर्द पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बिलाल अहमद अमरूदिदन शेख, पोलिस निरीक्षक (गुन्हे) हणमंत ओऊळकर, सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोउपनी मोटे, पोहवा/जवळ, पोहवा दरेकर, पोहवा जयेश पाटील, पोशि घोरपडे, पोशि-महेश काटकर, पोशि डमाळे, मपोशी सुनिता पवार, मसुब - हुबळे टिमने केली.

# एमटीएनएल केबल चोरी टोळीचा पर्दाफाश ; एक कोटींचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-१० ने एमटीएनएलच्या भूमिगत केबल चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत चार जणांना अटक केली आहे. या कारवाईत एमटीएनएलची केबल, दोन बोलेरो पिकअप, एक जेसीबी आणि मोबाईल फोन असा एकूण ?१ कोटी ५ हजार किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. न्यायालयाने सर्व आरोपींना ४ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, या टोळीचा इतर केबल चोरीच्या गुन्ह्यांशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे.

गुन्हे शाखेला ३० जून रोजी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे कक्ष-१० च्या पथकाने बोरीवली (पूर्व) येथील मागाठाणे टेलिफोन एक्स्चेंजजवळ क्लिरिऑन बिल्डिंगसमोर सापळा रचला.



## ♦ मुंबई गुन्हे शाखेची मोठी कारवाई

यावेळी दोन बोलेरो पिकअप वाहनांमधून भूमिगत एमटीएनएल केबल चोरी करून नेत असताना आरोपींना रंगेहात पकडण्यात आले. या प्रकरणी कक्ष-१० ने भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३०३(२), ३२४(५), ३(५) तसेच दूरसंचार अधिनियम, २०२३ मधील कलम ४२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भातील गुन्ह्याची नोंद कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये साहिल शकील शाह (२०), अब्दुल सिद्दीक अहमद शेख (३८), रिझवान मेहताब मलिक (२४) आणि मोहम्मद अफजल हसन खान (३५) यांचा समावेश आहे. कारवाईदरम्यान २,००० पेअरची ९८५ मीटर लांबीची एमटीएनएल केबल (किंमत ?३९.४० लाख), दोन बोलेरो पिकअप (प्रत्येकी ?१० लाख), एक जेसीबी (?४० लाख) आणि दोन मोबाईल फोन (?६५ हजार) असा एकूण ?१,००,०५,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तपासादरम्यान आरोपी अब्दुल सिद्दीक अहमद शेख याच्याविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात, तर मोहम्मद अफजल हसन खान याच्याविरुद्ध कांदिवली पोलीस ठाण्यात यापूर्वीही चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे. मुंबईत यापूर्वी चारकोप, समतानगर, आरे, कुरार, गोरेगाव आणि दिंडोशी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एमटीएनएल केबल चोरीचे अनेक गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे अटक करण्यात आलेल्या आरोपींचा या प्रकरणांशी संबंध आहे का, याचाही तपास गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त देवेन भारती, सहपोलीस आयुक्त (गुन्हे) अनिल कुंभारे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) कृष्णकांत उपाध्याय, पोलीस उपायुक्त (प्रकटीकरण-१) नवनाथ ढवळे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष-१० चे प्रभारी पोलीस निरीक्षक विशाल राजे यांच्या पथकाने केली.

# सरकारी रुग्णालयांमधील डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी 5,000 नवीन पदांना मंजुरी

## दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्य सेवा देण्यासाठी शासन कटिबद्धः आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** राज्यातील सरकारी रुग्णालयांमधील डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने नुकतेच १,४०० नवीन डॉक्टरांची भरती करण्याचे आदेश जारी केले आहेत. आरोग्य विभागाने ३,००० कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीला आणि इतर ५,००० नवीन पदांसाठी व्यापक भरती मोहिमेलाही मंजुरी दिली आहे. या आठवड्यात भरती प्रक्रिया वेगाने सुरू होईल, त्यानंतर आणखी ६०० डॉक्टरांची भरती केली जाईल. याव्यतिरिक्त, उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १,९०० सीएचओ पदेही लवकरच भरली जातील. ही घोषणा राज्याचे



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी विधानसभेत केली. प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार आणि इतर सदस्यांनी आरोग्य विभागातील रिक्त पदांचा मुद्दा उपस्थित केला. यावर उत्तर देताना आरोग्य मंत्र्यांनी सांगितले की, राज्यातील रिक्त पदे भरण्यासाठी सरकारने आवश्यक निर्णय घेतले आहेत. उप-जिल्हा रुग्णालयांसाठी प्रलंबित असलेला निधीही एका आठवड्याच्या आत मंजूर केला जाईल. अनेक ठिकाणी रुग्णालयांच्या इमारती बांधण्यात आल्या आहेत, परंतु डॉक्टर आणि इतर मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे सेवा ठप्प झाली आहे. आता, राज्यभरातील सर्व रुग्णालयांमध्ये डॉक्टरांसाठी नवीन पदे आणि नेमणुका, तसेच आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे आणि सुविधा पुरवल्या जातील. शासनाने रुग्णालय बांधकामाला प्राधान्य दिले आहे. ५०, ७०, ७५ आणि ९० टक्के पूर्ण झालेल्या प्रकल्पांना प्राधान्य दिले जाईल. केंद्र सरकारच्या नियमांनुसार प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध आहे, परंतु आवश्यकतेनुसार निधीचा आढावा घेण्यासाठी आणि तो वाढवण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल.

### सर्व नर्सिंग महाविद्यालयांमध्ये एसओपी लागू होणार

राज्यभरातील सर्व नर्सिंग महाविद्यालयांमध्ये शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) लागू केल्या जातील. तात्काळ कारवाई केली जाईल. ही माहिती मंत्री आबिटकर यांनी विधानसभेत दिली. नागपूर मध्य मतदारसंघाचे भाजप आमदार प्रवीण दतके आणि इतर आमदारांनी गोंदिया येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय नर्सिंग प्रशिक्षण शाळेतील ४५ विद्यार्थिनींना विषबाधा झाल्याचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना मंत्री आबिटकर म्हणाले की, या घटनेनंतर केटीएस जनरल हॉस्पिटलच्या मुंबई जिल्हा सर्जनने स्थापन केलेल्या चौकशी समिती आणि एफडीएच्या अहवालात विद्यार्थिनींना देण्यात आलेल्या अन्नात कोणतेही विष आढळले नाही. ते म्हणाले की, गोंदिया येथील नर्सिंग ट्रेनिंग स्कूलच्या वसतिगृहात विद्यार्थिनींना देण्यात येणाऱ्या अन्नाची आणि पिण्याच्या पाण्याची नियमितपणे तपासणी केली जात आहे.

# मोबाईलवर बोलत असताना उघड्या गटारात पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला !

प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबईः** मुंबईत मान्सूनच्या आगमनानंतर सुरू असलेल्या मुसळधार पावसात गुरुवारी (२ जुलै) साकीनाका परिसरात एक दुःखद घटना घडली. रस्त्यावरील उघड्या मॅनहोलमध्ये पडून एका ६० वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला. मृताची ओळख यादव नगर येथील रहिवासी अस्लम इसाक शेख अशी पटली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना गुरुवारी दुपारी १२:२६ च्या सुमारास खैराणी रोडवरील सन्मान हॉटेलजवळ असलेल्या एसजे स्टुडिओजवळ घडली.

## ♦ बीएमसीच्या कार्यशैलीवर पुन्हा प्रश्नचिन्ह?

एका खासगी कंत्राटदार कंपनीचे तीन कर्मचारी एका वाहनाने गटार वाहिनीच्या देखभालीचे काम करत होते. त्यांनी मॅनहोलचे झाकण उघडे ठेवले होते. त्याचवेळी, मोबाईलवर बोलत तिथून जात असलेल्या अस्लम शेख यांचे उघडे मॅनहोलकडे लक्ष गेले नाही आणि ते त्यात पडले. कर्मचाऱ्यांनी तात्काळ शिडीच्या साहाय्याने त्यांचा शोध घेतला, परंतु त्यांना आत फक्त त्यांची छत्री आणि चप्पल सापडली. पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे ते कोणत्या दिशेने वाहून गेले हे कळू शकले नाही. माहिती मिळताच, मुंबई अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी शोधमोहीम सुरू केली. मोठ्या प्रयत्नांनंतर, अग्निशमन दलाच्या पथकाने शेख यांना गंभीर अवस्थेत बाहेर काढले. त्यांना १०८ रुग्णवाहिकेने राजावाडी रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. पोलीस तपास करत आहेत... सध्या, मुंबई पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, मॅनहोलच्या कामादरम्यान सुरक्षा मानकांचे पालन केले गेले होते की नाही, याची खात्री करत आहेत. तसेच, या अपघातासाठी जबाबदार असलेल्यांची भूमिका काय होती? ही घटना अशा वेळी घडली आहे, जेव्हा काही दिवसांपूर्वीच मुंबईच्या महापौर रितू तावडे यांच्यासमोर बीएमसीचा एक कर्मचारी उघड्या गटारात पडला होता.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 26 /A3072, RRC Helpline No. 8484842135